# प्रेरणास्थान

प्र· प्राचार्य,-

सौ· निर्मळे. आर. एल.

# कुल मार्गदर्शक

प्रा· श्री. सोरटे. एस. के.

|| नहि ज्ञानेन सदृश्य पवित्रमिह विद्यते ||

श्री . बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबप संचलित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी . एड्. ), अशोकराव माने विद्यानगर, पेठ वडगाव .

ता . हातकणंगले

जि . कोल्हापूर

बी . एड् . सेमिस्टर भाग - I

प्रात्यक्षिक नाव - Enhancement In Professional Capacities

विषय - A6

प्रेरणा स्थान - प्र. प्राचार्य सौ. निर्मळे आर. एल

छात्राध्यापकाचे नाव - कु. दिव्या सागर माने

मार्गदर्शकाचे नाव - प्रा. पवार एम. आर. ( )
प्रा. सावंत एन. पी. (मॅडम)

रोल नंबर -

शैक्षणिक वर्ष - 2022-2023

मार्गदर्शक स्वाक्षरी

प्राचार्य स्वाक्षरी

Rajdhani
DATE / /

# EPC- Enhancement in Professional Capacities

# EPC- व्यावसायिक क्षमता वाढविणे.

## * उद्दिष्टये *

शिक्षणाच्या भाषेत त्यांची क्षमता वाढवण्यासाठी विदयार्थी शिक्षकांना सक्षम करणे.

विद्यार्थी शिक्षकांना त्यांच्या गोष्टी वाचण्याची आणि चर्चा करण्याची आणि संप्रेषण करण्याची आणि सुचनांच्या भाषेत लिहिण्याची क्षमता मजबूत करण्यासाठी सक्षम करणे.

विविध प्रकारच्या मजकुराचे वाचन आणि अर्थ काढण्याची चाचणी आणि क्षमता विकसित करण्यासाठी विदयार्थी शिक्षकांना सक्षम करणे.

विदयार्थी शिक्षकांना स्वयंशिक्षक चिंतनशील आणि सहयोगी व्यावसायिक बनण्यास सक्षम करणे.

ज्ञानाच्या पुनर्रचनेसाठी विदयार्थी शिक्षकांना विदयार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार विकसित करण्यास सक्षम करणे.

# अनुक्रमणिका

| नं | तपशिल | स्वाक्षरी |
|---|---|---|
| 1) | प्रस्तावना | |
| 2) | उद्दिष्ट्ये | |
| 3) | Unit-I - Writing based on the text - summary of scence, extropolation of Story, converting a situation into a dialogue etc. | |
| | Unit 2 - writing a review or a Summary ~~the~~ text, with the opinion comments and opinions | |
| | Unit-3 - Analysis of structure of article, identifying sub-heading key words, sequencing of idieas. illustration etc. | |
| | Unit-4 - Engaging with Education writing | |
| | स्वानुभव | |
| | समारोप. | |

Rajdhani
DATE / /

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या अंतर्गत सुरु असणाऱ्या बी.एड. अभ्यासक्रमात 'व्यावसायिक क्षमता वाढवेण' ह्या प्रात्यक्षिकेचा समावेश करण्यात आला. त्यानुसार आमच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्) महाविद्यालय, पेठ वडगाव यामध्ये आम्ही एखादी काल्पनिक कथा कशी सांगावी व नंतर एखाद्या गोष्टीचे तात्पर्य कसे लिहावे हे समजले. एखाद्या कादंबरीच्या सारांश लेखन कसे लिहावे हे समजले.

एखाद्या बातमीची ठळक बातमी, महत्वाच्या घटना आम्हांला कशा लिहावे हे शिकवले. आम्हाला मुद्द्यांची क्रमवार मांडणी कशा पद्धतीने असते हे शिकवले. आपल्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व काय आहे. यावर आम्हाला निबंध लिहिण्यास सांगितले. यामुळे आमच्या वाचनात भर पडली. व वेगवेगळ्या पुस्तकांचे लिखाण कसे करावे हे समजून घेण्यास मदत झाली.

घाबरलेल्या स्वरात म्हणाला " माहित हाय साहेब " माहित असूनही रमेश रस्त्यावर फिरतोय हे ऐकताच तो पोलीस मात्र रागात आला आणि त्याच्यावर चिडत म्हणाला " काय रे ? माहिती असूनही फिरतोयस बाहेर, काही कामधंदा नाहीये का तुला ? चल जा घरी परत, आणि हो लस घेतलीस का ? नसली घेतलीस तर जा जवळच्या शासकीय रुग्णालयात आणि घे " पोलिसाचं हे बोलणं ऐकून रमेश लटकं हासत पोलिसांना म्हणाला, " घरी पोरगं रडत हाय साहेब, भूक लागलीया त्याला. पण काय करु अमच्या घरचं समदं धान्य संपलया. भूक लागणार नाय असली कोणती लस हाय का साहेब ? असलं तर सांगा आम्हासनी, आम्ही समदे घेतो. म्हंजी कोरोना जाईस्तवर आम्हाला भूक लागणार नाय " आणि तो तिथून निघून गेला. त्याचे ते बोलणं ऐकून पोलिसाचे डोळे पाणावले आणि त्याने त्याला परत बोलावलं, त्याच्या घरचा पत्ता विचारून घेतला आणि पुढच्या दोन तासात त्याला महिनाभर लागेल एवढं धान्य त्याच्या घरी घेऊन गेला. त्या पोलिसाने आणलेलं धान्य पाहून रमेशचे डोळे पाणावले आणि हात जोडत त्याने पोलिसाचे आभार मानले. पोलिसाने देखील राहुलच्या डोक्यावरून हात फिरवला आणि तिथून चालू लागला... तेथून निघताना त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होता... एक वेगळंच समाधान त्याला जाणवत होतं... आनंदाने गहिवरून तो मनोमन विचार करु लागला.

तात्पर्य :- " स्वतःच आपली ओंजळ सुखाने भरलेली असताना ती सांडायच्या आत इतरांना त्यातलं देता आलं तर त्याच्या इतकं समाधान आणि त्यातून मिळालेला आनंद हा कशातच मोजता येतं नाही "

Rajdhani
DATE / /

# Unit-1

कथा आणि वर्णनात्मक खात्यांसह व्यस्त.

मजकूर काल्पित कथा, नाट्यमय घटना, ज्वलंत वर्णनात्मक यातील कथा / अध्यायांमधून निवडतो खाती आणि कॉमिक स्ट्रिप दगड.

सुचवलेले उपक्रम.

आकलनासाठी वाचन (वैयक्तिक अधिक गट वाचन आणि चर्चा स्पष्टीकरण)

लहान गटासमोर (खाद्यात्या जीवनानुभवावरून संबंधित खात्याचे वर्णन करणे (वर्णन लिहणे)

पात्रे आणि परिस्थितींची चर्चा (~~मत~~, थोड्यामध्ये व्याख्या आणि दृष्टिकोन सामायिक करणे)

मजकुरावर आधारित लेखन- दृश्याचा सारांश, कथेचा विस्तार, परिस्थितीचे रुपांतर, संवाद (वैयक्तिक कार्य)

Rajdhani
DATE / /


Writing based on the text - Summary of Scence, exptrapolation of Story converting a Situation into a dialogue Etc. (Individual Task)

# सुखाची ओंजळ ...

" आप्पा मला भूक लागलीय ओ..
मला भूक लागलीय... मला काहीतरी खायला द्या
ना... द्या ना आप्पा...

असं भूकेलेल्या आणि रडक्या स्वरात म्हणत रमेशचा मुलगा राहुल शेवटी पाय पोटाशी घेऊन झोपी गेला. भूकेपोटी राहुलची झालेली ती अवस्था पाहून रमेशच्या डोळ्यात पाणी आलं... त्याच अवस्थेत बाजूला बसलेल्या त्याच्या बायकोकडे त्याने एक नजर टाकली, तिच्याही डोळ्यात पाणी तरळलेलं होतं... शेवटी तिथून उठून जावं असा विचार करत तो घरातून बाहेर पडला..

काय करणार बिचारा ? रमेश एक गवंडी माणूस होता. कुठेही चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी तो कामाला जात असे. आणि रोजच्या मिळालेल्या कमाईवर तो घर भागवत असे. पण, सध्याच्या परिस्थितीमुळे त्याला कुठे कामही मिळत नव्हतं आणि कमाई तर होणं शक्यच नव्हतं. त्याच्या घरचं सगळं धान्य संपलं होतं. शेवटी काहीतर केलचं पाहिजे असा विचार करत डोळ्यांच्या कडयावरचं पाणी पुसत रमेश चालत चालत चौकाच्या जवळ आला. चौकात पोलिस उभे होते. अशा या कडक उन्हात, निर्जन रस्त्यावर कोणीतरी एक माणूस चालत येतोय. हे पोलिसांच्या लक्षात आलं. रमेश चालत चालत चौकात आला. पोलिसांनी त्याला आडवलं. तितक्यात एक पोलिस समोर येत रमेशला म्हणाला " काय रे ? का रस्त्याने फिरतोयस ? लॉकडाऊन चालूय माहित नाही का ? त्यावर रमेश


शिवाजी सावंत
मृत्युंजय

# Unit - 2.

⇐ लोकप्रिय विषय आधारित एक्सपोझिटरी लेखनासह व्यस्त रहा

निवडलेल्या मजकुरात समाविष्ट असू शकते - लेख, चरित्रात्मक लेखन, विद्यार्थी शिक्षकांच्या विषय क्षेत्रातून काढलेल्या थीमसह लोकप्रिय नॉन फिक्शन लेखनातील उतारे.
( विविध विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल, साहीत्य )

⇐ सुचविलेले उपक्रम

1) एकूण अर्थ, माहिती, विषयाचे ज्ञान काढण्यासाठी वाचन (जोड्यामध्ये मार्गदर्शित वाचन आणि साधी नोट बनवणे)

2) प्रमुख संकल्पना आणि कल्पनांच्या समावेश करणे आणि त्यांवर नोंद करणे ही योजना आहे. योजनाबद्ध स्वरूपात नोट्स तयार करणे.
फॉर्म- फ्लो डायग्राम, ट्री डायग्राम, माईंड मॅप इ (जोड्यांमध्ये काम करताना मार्गदर्शन)

3) मजकूर विषयाच्या सारांश इतरांना समजावून सांगणे. (मोठा गट)

4) टिप्पण्या आणि मतांसह पुनरावलोकन किंवा मजकुरांचा सारांश लिहिणे (वैयक्तिक कार्य)

Rajdhani
DATE / /

अचानक निखळून गळावे तसे दोन चमचम करणारे सुवर्णदातही लालसर झाले होते. असे दान कसे द्यावे ? हा विचार करत कर्णाने त्यांस आपल्या डोळ्यांपाशी नेले. त्या नयनकमलांतून वाहणाऱ्या अश्रुजलात न्हाऊन पवित्र झालेले रद रेशीम कापडाने पुसून घेत हे शेवटचे दान त्या याचकास सुपूर्द करत कर्णाने कायमचे डोळे मिटले.

कांदबरीची वैशिष्ट्ये -

या कांदबरीचे एक पाहताक्षणीच नजरेस येणारे खास वैशिष्ट्य म्हणजे ही इतर कांदबऱ्याप्रमाणे एकमुखी गोष्ट नाही आहे तर महाभारतातील विविध पात्रांच्या मुखांतून पुस्तकाच्या प्रत्येक पानावर झरझर उतरणारा कर्णाचा जीवनपट आहे कुंतीला मिळालेला असामान्य वरदान, त्यातूनच कर्णाचा झालेला असामान्य जन्म, जगाच्या भीतीने कुंतीने घेतलेला कठोर निर्णय, गुरु द्रोण आणि पांडवांकडून कर्णाचा झालेला अपमान, त्यातूनच दुर्योधनासोबत जन्मास आलेले मित्रप्रेम, द्रौपदी वस्त्रहरण, कुरुक्षेत्रातील युद्ध या सर्वच गोष्टी वरवर प्रत्येकास माहित आहेतच. पण या प्रत्येक गोष्टींत काही बारीक बारीक अशा कितीतरी गोष्टी दडलेल्या आहेत ज्या पुस्तक हाती घेण्याआधी आपल्या विचारांतही नसतात किंवा वर्षानुवर्षे आपण या प्रश्नांची उत्तरे शोधत आलो आहोत पण जी अजूनही अनुत्तरीत आहेत. उदाहरणार्थ कुंतीला ही पुत्रप्राप्ती नक्की कशी झाली ? सारथ्याच्या घरी कर्णाचे बालपण कसे असेल ? शोण म्हणून असलेला राधेचा मुलगा या कर्णासोबत कसा वागत होता ? कर्णाची पत्नी वृषाली नक्की कशी होती. त्यांच्यातील प्रीतीचे क्षण कधी फुलले होते कि इंद्राला कवच कुंडल दान केल्यानंतर निस्तेज झालेल्या कर्णाप्रमाणे त्याचे प्रेमजीवनही कोमेजलेले होते ? सुर्याचा पुत्र असूनही त्याने धर्माच्या विरोधात अधर्मी दुर्योधनास नेहमी साथ का दिली... केवळ मैत्रीसाठी ? द्रौपदी वस्त्रहरणात त्याने द्रौपदीचे रक्षण नक्की का केले नाही ? अभिमन्युला धर्माविरुद्ध जात

Writing a review or a Summary the text, with the opinion comments and opinions.

# पुस्तकाचे नाव-
# मृत्युंजय (कादंबरी)

– शिवाजी सावंत.

महाभारतातील 'कर्ण' या व्यक्तिरेखेवर आधारित 'शिवाजी सावंत' यांनी लिहलेली कादंबरी. या कादंबरीला २५ सप्टेंबर 1995 रोजी या पुस्तकाला 'भारतीय ज्ञानपीठ' या संस्थेतर्फे मूर्तिदेवी पुरस्कार जाहीर झाला. व या संस्थेद्वारे 12 वा मूर्तीदेवी पुरस्कार 1996 ला देण्यात आला ही कादंबरी 1962 साली प्रकाशित करण्यात आली.

महाभारतातील सामान्यतः खलनायक म्हणून परिचित असलेल्या महावीर कर्णाच्या असामान्य व्यक्तिमत्वाच्या मागोवा ही कादंबरी घेते. बऱ्याच कथा सर्वांनाच परिचित आहेत. नायक असूनही बहुतांशी सगळीकडे तो एक खलनायक भासतो. पण शिवाजी सावंत लिखित 'मृत्युंजय' कांदबरी हाती घेतली आणि जणू कर्णाचे जीवन नव्याने माझ्या मनात उलगडले गेले. कर्णासारखा दानशूर या भूमीवर कुणीच नव्हता हे वर रेखाटले-ल्या चित्रावरून सिद्ध झालेच. अशा अनेक परिचित अपरिचित प्रसंगांशी आपली अगदी जवळून ओळख करून देते ही कादंबरी... मराठी साहित्यास शिवाजी सावंत यांसकडून मिळालेली आणखी एक देणगी.

कुरुक्षेत्रावर सुरु असलेल्या कौरव - पांडवांच्या युद्धाच्या तो सतरावा दिवस. वेळ जवळ जवळ सुर्यास्ताची कौरव आणि

पांडव या दोन्ही पक्षांतील योद्धे सारे स्तब्ध उभे समोर जमिनीवर रक्तात न्हालेला महावीर कर्ण मृत्यूच्या शेवटच्या घटका मोजत इथे कर्ण मृत्यूच्या दारात आणि आसपास सभोवताली पडला होता मृत सैनिकांचा रक्तबंबाळ झालेल्या प्रेतांचा खच... इथे कर्णाच्या शेवट पाहात उभ्या योद्ध्यांची मुग्ध शांतता आणि चहूकडे फक्त आकांत... त्या सैनिकांच्या स्वकीयांचा. कर्ण आपल्या मावळत्या पित्याला शेवटचा निरोप देत असतानाच त्याचे लक्ष वेधले गेले... एका पित्याच्या मदतीसाठी मारलेल्या हाकेकडे... एका दीर्घ आकांताकडे... एका करुणामयी विनवणीकडे.

"अरे या कुरुक्षेत्रावर कोणी आहे का? मला मदत करणारा युद्धात मुलगा मारला गेला माझा त्याच्या अंतिम कार्यासाठीही द्रव्य नाही माझ्याकडे. कोणी आहे का? ही मदतीसाठी मारलेली हाक दानवीर कर्णाने ऐकली आणि त्याने त्या याचकास जवळ बोलावले. त्याला इच्छा विचारली तेव्हा खरेतर त्या याचकास देण्यासाठी त्या क्षणी कर्णाकडे स्वतः कडे काहीच द्रव्य नव्हते. पण तरीही कर्णाने आपला दानधर्म न त्यागता आपल्या मुलास जवळ बोलावले आणि जखम त्या जखमी स्थितीतही तो म्हणाला.

"पुत्रा, आयुष्यभर जे मजपाशी होते तेते सर्व जेव्हा जेव्हा ज्याने मागितले मी त्यास दिले. पण आज हा याचक असाच रिकाम्या हाताने माझ्यापाशी येऊन परत जाणार हे कदापि शक्य नाही. तू एक काम कर. तो पडलेला जमिनीवरचा दगड घे आणि या आणि माझ्या तोंडात असलेले हे दोन सोन्याचे दात पाड आणि या दुःखी पित्यास दे त्याच्या मुलाच्या अंतिम संस्कार करण्यासाठी ते त्याच्या कामा येतील."

आपल्या यमसदनी निघालेल्या पित्यासोबत असे निष्ठुर कृत्य करण्यास न धजावणाऱ्या पुत्रास पाहून शेवटी कर्णाने त्यास तशी आज्ञा केली. तेव्हा रडत रडतच दुःखी अंतःकरणाने त्या पुत्राने आपल्या पित्याची ती आज्ञा मानली आणि दगडाच्या घावांनी कर्णाचे तोंड रक्तबंबाळ केले. त्या रक्तवर्णात मोतीमालेतून

Rajdhani
DATE / /

# Unit - 3.

पत्रकारितेच्या लेखनात व्यस्त.

निवडलेल्या ग्रंथांमध्ये समकालीन विषयांवरील वर्तमान / मासिक लेखांचा समावेश असेल. (या घटकासाठी विद्यार्थी शिक्षक यादृच्छिकपणे गटबद्ध केले जाऊ शकतात)

सुचविलेले उपक्रम -

1) वाचन धोरणे वापरणे, जसे की स्कॅनिंग, स्किमिंग आणि लेखाच्या सुरुवातीला वाचनासाठी योग्य माहिती काढण्यासाठी वाचन (मार्गदर्शन वैयक्तिक कार्य)
2) लेखाच्या संरचनेचे विश्लेषण, उपशीर्षके ओळखणे, मुख्य शब्द, कल्पनांचा क्रम, चित्रे किंवा सांख्यिकीय सादरीकरणे इत्यादी.
3) विषयांशी संबंधित संदर्भ पुस्तकांमध्ये गुंतणे.

या घटकासाठी विद्यार्थी शिक्षकांनी त्यांच्या विषयानुसार विभागलेल्या गटात काम करावे. या गटामध्ये, विद्यार्थी शिक्षकांच्या जोड्या त्यांच्या विषय क्षेत्रातील विशिष्ट विषयाची निवड करतील ज्यावर ते उपलब्ध संदर्भ पुस्तकांच्या संचामधून संशोधन करू शकतील.

सुचविलेले उपक्रम

1) संशोधनासाठी विषय निवडणे काही मार्गदर्शक प्रश्न मांडणे.
2) संबंधित संदर्भ पुस्तके शोधणे
3) नोट्स बनवून पुस्तकांमधून संबंधित माहिती स्कॅनिंग, स्किमिंग आणि काढणे.
4) संपूर्ण विषय गटासाठी प्रदर्शन आणि मौखिक घटकांसह सादरीकरणाचे नियोजन करणे.

Rajdhani
DATE / /

मारण्यात कर्ण का सामील झाला? खरेच तो अधर्मी होता? जर असे होते तर मग श्रीकृष्ण विरुद्ध पक्षात असतानाही त्याने या सूतपुत्राच्या अंतिम संस्कार करण्यात रस का दाखवला? जसजसे आपण एकेक पान वाचत जावू तसतसा हा हळूहळू उलगडत जाणारा खुलासा आपल्याला जागीच खिळवून ठेवतो।

Rajdhani
DATE / /

Analysis of structure of the article, identifying, Sub-heading, key words, Sequencing of ideas illustration or statistical representation etc.

# ठळक बातमी

दि 1 डिसेंबर 2022

पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी ६८६ कोटींचा आराखडा तयार.

## बातमी

केंद्र व राज्य शासनाकडून निधीसाठी पाठपुरावा करू: राजेश क्षीरसागर

## महत्वाच्या घटना (key words) -

जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांना यावेळी ६८६ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगितले.

पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी प्रकल्प अहवाल तत्काळ सादर करण्याच्या सूचना पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जैसवाल यांनी दिल्या.

कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी महानगरपालिका तसेच जिल्हा परिषदेमधील १७१ ? गावांपैकी ३९ गावांतून सांडपाणी उद्योगधंदे या पंचगंगा खोऱ्यातील घटकांद्वारे १८२.५ दशलक्ष लिटर दरदिवशी सांडपाणी तयार होते.

पंचगंगा प्रदूषणप्रश्नी यापूर्वी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

राजेश क्षीरसागर म्हणाले, पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

न्यायालयाच्या आदेशानुसार उपाययोजना

# पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी ६८६ कोटींचा आराखडा तयार

## केंद्र व राज्य शासनाकडून निधीसाठी पाठपुरावा करू : राजेश क्षीरसागर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पंचगंगा नदी प्रदूषणाचा गंभीर प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर चर्चा करून केंद्र व राज्य सरकारकडून विविध योजनांतून निधी आणण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी दिली. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी यावेळी ६८६ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगितले.

दरम्यान, पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी प्रकल्प अहवाल तत्काळ सादर करण्याच्या सूचना पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जैसवाल यांनी दिल्या.

पंचगंगा प्रदूषणमुक्तीच्या उपाययोजनांबाबत राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली पंचगंगा नदी प्रदूषण रोखण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईन बैठक घेण्यात आली. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जैसवाल, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, प्रदूषण नियंत्रण विभागाचे महासंचालक डॉ. व्ही. बी. सोनटक्के, विभागीय आयुक्त सौरभ राव, प्रादेशिक अधिकारी जे. एस. साळुंखे, एमआयडीसीचे विशेष कार्यकारी अधिकारी एस. बी. पाटील सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी रेखावार, महापालिका आयुक्त कादंबरी बलकवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी, प्रदूषणमुक्तीसाठी करण्यात येत असलेल्या उपायांची माहिती दिली.



कोल्हापूर : पंचगंगा प्रदूषणप्रश्नी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत बोलताना राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर. शेजारी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण व इतर.

राजेश क्षीरसागर म्हणाले, पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. यासाठीचे प्रकल्प नियमित राबवून प्रदूषण नियंत्रणासाठी निधीची तरतूद होणे आवश्यक आहे. या दृष्टीने त्या त्या विभागांनी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा. जेणेकरून या अहवालातील बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करून पंचगंगेचे प्रदूषण पूर्णपणे रोखण्यात यश येईल.

यावेळी प्रधान सचिव संजीव जैसवाल यांनी कोल्हापूर व इचलकरंजी येथील किती सांडपाणी पंचगंगा नदीत थेट मिसळते याची माहिती घेतली. तसेच किती पाण्यावर प्रक्रिया करून ते नदीत मिसळते, याचा आढावा घेतला. शहराला संलग्न असणाऱ्या ग्रामीण भागातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा महापालिकेने विचार करावा, असे सांगितले.

### न्यायालयाच्या आदेशानुसार उपाययोजना

पंचगंगा प्रदूषणप्रश्नी यापूर्वी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यांच्या आदेशाप्रमाणे योग्य त्या उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच नव्याने सादर करण्यात आलेल्या आराखड्यात कोल्हापूर महानगरपालिकेने शहरात ३५ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे चार प्रकल्प उभारले जाणार आहेत, असे सांगितले. यासाठी ४१५ कोटी ५७ लाख रुपयांचा, तर इचलकरंजीसाठी सुमारे २७१ कोटी रुपयांचा असा एकूण ६८६ कोटी ५७ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

### पंचगंगा प्रदूषणाला जबाबदार घटकांची सादरीकरणाद्वारे माहिती

जिल्हाधिकारी रेखावार यांनी पंचगंगा प्रदूषणाला जबाबदार घटक व उपाययोजनांबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी महानगरपालिका तसेच जिल्हा परिषदेमधील १७१ गावांपैकी ३९ गावातून सांडपाणी, उद्योगांद्वारे या पंचगंगा खोऱ्यातील घटकांद्वारे १८२.४ दशलक्ष लिटर दररोज सांडपाणी तयार होते. यापैकी १३६.३ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. तर ४६.३ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा सध्या उपलब्ध नसल्याने हे घटक नदी प्रदूषणाला कारणीभूत ठरत आहेत. कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका व गावांमधील घरगुती सांडपाण्यावर तसेच कारखान्यांमधील सांडपाण्यावर [illegible] प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठीचा अंदाजित आराखड्याबाबत जिल्हाधिकारी रेखावार, महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी माहिती दिली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी, इचलकरंजी महानगरपालिका व संबंधित यंत्रणांनी नदी प्रदूषणाला जबाबदार घटकांचा अभ्यास करून विभागीय आयुक्तांमार्फत सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा. ग्रामीण सांडपाण्यावर [illegible] प्रक्रिया करण्याचा प्रकल्प आराखडा स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर करावा, अशा सूचना दिल्या.

विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी, पंचगंगा प्रदूषण रोखण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समिती स्थापन करून वेळोवेळी अहवाल सादर करण्यात आले आहेत असे सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, उपप्रादेशिक अधिकारी प्रमोद माने, कार्यकारी अभियंता अतुल दोरे, पर्यावरण [illegible] आदी उपस्थित होते.

# Unit - 4.

शैक्षणिक लेखनात व्यस्त रहा.

निवडक मजकूर लोकप्रिय शैक्षणिक लेखनाच्या विस्तृत श्रेणीतून उत्तम प्रकारे लिहिलेला निबंध, अर्क किंवा शिक्षणातील थीम हाताळणाऱ्या लेखकांच्या अध्यायांच्या स्वरूपात काढले जाऊ शकतात.

अ) निबंधातील थीम आणि युक्तिवाद समजून घेण्यासाठी वाचन (मार्गदर्शित वाचन- वैयक्तिकरित्या / इन जोड्या)

ब) युक्तिवादाच्या संरचनेचे विश्लेषण करणे (मार्गदर्शित छोटी गट चर्चा)

क) थीमची चर्चा, प्रतिसाद आणि दृष्टिकोन सामयिक करणे (लहान गट चर्चा)

ड) प्रतिसाद पेपर लिहणे (वैयक्तिकरीत्या) आणि निवडक पेपर्सचे सादरीकरण करणे. (मोठा गट)

इ) कार्यक्रमादरम्यान आलेल्या सर्व अनुभवांवर अहवालाच्या रूपात विचार करा आणि अंतिम सादरीकरण करा.

* सुचविलेले उपक्रम

1) तुमच्या स्वतःच्या जीवनातील अनुभवाचे वर्णन करा आणि परिस्थितीला संवादात रूपांतरीत करा.

2) जर्नलमधील (किमान 2) सामाजिक समस्यांवरील संशोधन लेखांचे पुनरावलोकन

3) कोणत्याही दोन वर्तमानपत्रातील लेखांच्या संरचनेचे विश्लेषण करा.

4) "शिक्षकांची बदलती भूमिका" या विषयावर परिसंवाद

5) तुमच्या विषय क्षेत्रातून कोणत्याही विषयावर सादरीकरण तयार करा.

7) पंचगंगा प्रदूषणाला जबाबदार घटकांची सादरीकरणाद्वारे माहिती.

8) कोल्हापूर इचलकरंजी महानगरपालिका व गावांमधील घरगुती सांडपाण्यावर व कारखान्यांमधील सांडपाण्यावर अद्ययावत प्रक्रिया, प्रकल्प उभारण्यासाठीच्या अंदाजित आराखड्याबाबत माहिती दिली.

9) सध्या 136.3 दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते.

10) तर ४६.३ दशलक्ष लीटर सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा संध्या उपलब्ध नसल्याने हे घटक नदी प्रदूषणाला कारणीभूत ठरत आहेत.

## * Sequenceing of ideas -
## मुद्दयाची क्रमवार मांडणी -

1) प्रदूषण पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी ६८६ कोटींचा आराखडा तयार.

2) केंद्र व राज्य शासनाकडून निधीसाठी पाठपुरावा करु : राजेश क्षीरसागर.

3) पंचगंगा प्रदूषण मुक्तीसाठी उपायोजनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईन बैठक घेण्यात आली

4) प्रधान सचिव संजीव जैसवाल यांनी कोल्हापूर व इचलकरंजी येथील सांडपाणी पंचगंगा नदीत येत मिसळते याची माहिती घेतली

5) तसेच किती सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते नदीत मिसळते याचा आढावा घेतला.

6) जिल्हाधिकारी रेखावार, महापालिका आयुक्त कादंबरी बलकवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी प्रदूषणमुक्तीसाठी येत असलेल्या उपायांची माहिती दिली


7) नव्याने सादर करण्यात आलेल्या आराखड्यात कोल्हापूर महानगरपालिकेने शहरात ३५ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे चार प्रकल्प उभारले जाणार आहेत.

8) यासाठी ६१५ कोटी ५७ लाख रुपयांचा, तर इचलकरंजी सुमारे २७१ कोटी रुपयांचा असा एकूण ८८६ कोटी ५७ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

9) शहराला संलग्नित असणाऱ्या ग्रामीण भागातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा महापालिकेने विचार करावा असे सांगितले.

10) घरगुती सांडपाण्यावर सनियंत्रण प्रक्रिया करण्याच्या प्रकल्प आराखडा स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर करावा, अशी सूचना दिल्या.

# Illustration or Statistical Representation.




पंचगंगा प्रदूषण : आराखडा.

दक्षिणायनात ५° ते ७° दक्षिणेकडे असा हा स्थान बदल होतो. याला हवादाबपट्ट्यांचे आंदोलन म्हणतात.

हवेच्या दाबाचे परिणाम -

वाऱ्यांची निर्मिती
वादळांची निर्मिती
उंची मोजण्यासाठी उपयुक्त
आरोह पर्जन्याची निर्मिती
श्वसनक्रियेवर परिणाम.

समदाब रेषा - समान हवेचा दाब असलेली ठिकाणे ज्या रेषेने नकाशावर जोडलेली असतात, त्या रेषेला 'समदाब रेषा' असे म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| | | या प्रदेशात पाऊस पडत नाही. त्यामुळे पृथ्वीवरील बहुतांश उष्ण वाळवंटे याच प्रदेशात आढळून येतात. |
| उपध्रुवीय कमी दाबाचे पट्टे | उत्तर गोलार्धात आणि दक्षिण गोलार्धात ५५° ते ६५° अक्षवृत्ता-दरम्यान. | १) ध्रुवाकडील प्रदेशाचे क्षेत्र कमी होत जाते, कारण पृथ्वीचा ध्रुवाकडे जाणारा भाग तुलनेने वक्राकार आहे. २) या वक्राकारामुळे वाऱ्यांना बाहेर जाण्यास जास्त वाव मिळतो. ३) पृथ्वीच्या पृष्ठभागावरील हवेच्या कमी घर्षणामुळे आणि परिवलनाच्या गतीमुळे या भागातील हवा बाहेर फेकली जाते. |
| ध्रुवीय जास्त दाबाचे पट्टे | दोन्ही गोलार्धात ८०° ते ९०° अक्षवृत्तांदरम्यान | १) उत्तर व दक्षिण ध्रुवीय प्रदेशांत वर्षभर तापमान शून्य अंश सेल्सिअसपेक्षाही कमी असते. २) तेथील हवा थंड असते, त्यामुळे या प्रदेशात पृथ्वीच्या पृष्ठभागालगत हवेच्या जास्त दाबाचे पट्टे तयार होतात. |

हवादाब पट्ट्यांचे आंदोलन –

सूर्याच्या उत्तरायण आणि दक्षिणायनामुळे पृथ्वीवर पडणाऱ्या सूर्यप्रकाशाचा कालावधी आणि तीव्रता यामध्ये विषुववृत्तापासून उत्तर व दक्षिण ध्रुवाकडे जाताना बदल होतो.

त्यामुळे, तापमानपट्टे आणि त्यावर अवलंबून असणारे दाबपट्टे यांच्या स्थानात बदल होतो. उत्तरायणात ५° ते ७° उत्तरेकडे किंवा

Rajdhani
DATE / /

# स्वानुभव

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत कॉलेज ऑफ एज्युकेशन पेठ वडगाव यांच्यावतीने आमच्या या कॉलेजमध्ये "व्यावसायिक क्षमता वाढविणे" "Enhancement in professional capacities" हे प्रात्याक्षिक राबविण्यात आले. या प्रात्याक्षिकामध्ये आम्ही सर्व छात्राध्यापकांनी काल युनिट वन मध्ये काल्पनिक कथा व तात्पर्य सांगितले. युनिट टूमध्ये आम्ही वाचलेल्या एका पुस्तकाचे सारांश सांगितला. युनिट थ्री मध्ये एखाद्या बातमीचे वर्गीकरण कसे करायचे हे शिकलो. त्याचबरोबर युनिट फोरमध्ये आवडलेल्या एखाद्या घड्यांचा सारांश कसा लिहायचा हे शिकलो.

हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी आमच्या प्रेरणास्थान असणाऱ्या प्र. प्राचार्या सौ. निर्मळे. आर. एल. मार्गदर्शक प्रा. सौ. सावंत. ए. पी. प्रा. श्री. सोरटे. एस. के. त्याचबरोबर प्रा. सौ. शिरलोडे. व्ही. आर. प्रा. चरणाकर. जे. एस. यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

Rajdhani
DATE / /

# समारोप

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत आमच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) पेठ वडगाव अंतर्गत महाविद्यालयामध्ये 'Enhancement in Professional capacities (EPC) - व्यावसायिक क्षमता वाढविणे' हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी आमच्या प्रेरणास्थान असणाऱ्या प्र. प्राचार्या सौ. निर्मळे . आर. एल. मार्गदर्शक . प्रा. श्री सोरटे . एस. के , प्रा. सौ. सावंत. ए. पी त्याचबरोबर प्रा. सौ. शिरतोडे . व्ही. आर. प्रा. चरणकर. जे. एस. याचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे.

seen

[signature]